# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी
## विद्युत विभाग

**विषय:- ठाणे शहर पोलिस आयुक्तलयातील परिमंडळ 1,2,3 (Integration),4 व 5 या विभागात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उभारणी प्रकल्पा मध्ये मनपा हददीमधील कामाकरिता येणाऱ्या खर्चामध्ये मनपाचा सहभाग/योगदान देणेबाबत.**

**प्रस्तावना**

ठाणे शहर पोलिस आयुक्तलयातील परिमंडळ 1,2,3 (Integration),4 व 5 या विभागात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उभारणी कामी प्रकल्प् अहवालास मंजुरीबाबत मा.अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त् समितीची बैठकीचे इतिवृत्त् गृह विभाग मंत्रालय यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण – 0722/प्र.क्र.87/पोल-3 दिनांक 17/07/2023 व मा.अपर पोलिस आयुक्त्(प्रशासन), ठाणे शहर यांच्याकडिल दि.20/7/2023 रोजीचे पत्र प्राप्त् झाले असून त्यांनी बैठकीत केलेल्या सुचनानुसार महानगरपालिका हद्दीमध्ये सदर प्रकल्पास येणाऱ्या Capex व Opex खर्चा मध्ये महानगरपालिकेचा सहभाग/योगदान देणेबाबत RI व ROW सूट देणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार दिनांक 27/07/2023 रोजी पोलिस विभागाकडिल अधिकारी सोबत महानगरपालिके मध्ये झालेल्या आढावा बैठकिमध्ये प्रकल्पाचे झालेले सादरीकरण व त्यानुसार झालेल्या चर्चेनुसार भिवंडी शहर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे बाबत आढावा घेण्यात आला असून त्यामध्ये महानगरपालिकेच्या दृष्टीने शहरातील महत्वाचे चौक, धार्मिक स्थळे, मनपा शाळा, मनपा कार्यालय, मिरवणूक मार्ग, विर्सजन घाट, मनपा सांस्कृतिक केंद्रे, इत्यादीं ठिकाणांचा तसेच यापूर्वी महानगरपालिकेने दिलेल्या 57 ठिकाणांचा देखील समावेश आहे.

उपरोक्त् सर्व्हेच्यां ठिकाणा व्यतिरीक्त् आवश्यकतेनुसार 15 ठिकाणी 35 नग सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याची आवश्यकता असल्याचे चर्चा करून त्याबाबत पोलीस विभागाला यादी सादर करावयाची आहे.

सदर प्रकल्पा करिता Capex खर्च अंदाजे रुपये 30 कोटी व निगा व दुरूस्ती कामी वार्षिक Opex खर्च अंदाजे रुपये 2.5 ते 3 कोटी असल्याचे दिनांक 27/07/2023 रोजी पोलिस विभागा सोबत झालेल्या आढावा बैठकि मधिल प्रकल्पाच्या सादरिकरणामध्ये सांगण्यात आलेले आहे.

सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे प्रकल्पा करिता Capex खर्चाचा महानगरपालिकेचा सहभाग/योगदान देणेकामी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने सध्या महानगरपालिके मार्फत दरवर्षी भाडयाने कॅमेरे लावण्याबाबत वार्षीक अंदाजे 20 लाखां पर्यंत खर्च करण्यात येत असतो. सदर सी.सी.टी.व्ही. प्रकल्प पुर्ण झाल्यास महानगरपालिकेचा सदरचा खर्च कमी होईल. सदरचा कमी होणारा खर्च व सदर प्रकल्पा करिता Capex खर्च अंदाजे रुपये 30 कोटी असल्याने व मनपाची आर्थिक स्थिती तसेच प्राप्त् शासन निधी लेखाशिर्ष अतंर्गत सदर कामी निधी उपलब्ध करणेची तरतुद शक्य् नाही. परंतु सदर प्रकल्प भिवंडी शहरातील नागरीकांची सुरक्षा व कायदा व सुव्यवस्था ठेवणेकामी राबविला जाणार असल्याने व प्रकल्पाचा खर्च शासन स्तरावर होत असल्याने महानगरपालिकेच्या विविध महसुली उत्पन्नातून प्रकल्पा करिता होणाऱ्या वार्षिक निगा व दुरूस्ती खर्च (Opex) अंदाजे रुपये 2.5 कोटी (Opex) खर्चामध्ये 50 टक्के इतक्या खर्चाचा सहभाग/योगदान देणेबाबत व RI व ROW सूट देणेस प्रस्ताव सादर केलेला आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 अ च्या (1 अ ) तरतुदी नुसार अधिकार मा. आयुक्त् तथा प्रशासक यांना आहेत. त्यानुसार वरिल प्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव** 236 **दिनांक** 21/8/2023

**विषयः- ठाणे शहर पोलिस आयुक्तलयातील परिमंडळ 1,2,3 (Integration),4 व 5 या विभागात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उभारणी प्रकल्या मध्ये मनपा हददीमधील कामाकरिता येणाऱ्या खर्चामध्ये मनपाचा सहभाग/योगदान देणेबाबत.**

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ 1,2,3 (Integration),4 व 5 या विभागात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा राबविणेकामी गृह विभाग, महाराष्ट्र शासना कडून तयार करण्यात आलेल्या DPR नुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हददीतील राबविण्यात येणाऱ्या सदर प्रकल्पा करिता गृह विभाग मंत्रालय यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण – 0722/प्र.क्र.87/पोल-3 दिनांक 17/07/2023 च्या अनुषंगाने दि. 05/07/2023 रोजी झालेल्या आढावा बैठकीतील मा.अपर मुख्य सचिव(गृह) यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रकल्पाचा Capex खर्च अंदाजे रुपये 30 कोटी व Opex खर्च अंदाजे रुपये 2.5 कोटी प्रति वर्ष खर्चाचा महानगरपालिकेचा सहभाग/योगदान देणेबाबत कळविणेत आले आहे.

सदर प्रकल्पाच्या Capex खर्चात महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने सहभाग/योगदान शक्य् नाही. परंतु शहरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे प्रकल्प भिवंडी शहरातील नागरीकांची सुरक्षा व कायदा व सुव्यवस्था ठेवणेकामी राबविला जाणार असल्याने व प्रकल्पाचा खर्च शासन स्तरावर होत असल्याने महानगरपालिकेच्या विविध महसुली उत्पन्नातून प्रकल्पा करिता होणाऱ्या वार्षिक निगा व दुरूस्ती खर्च अंदाजे रुपये 2.5 कोटी (Opex) खर्चामध्ये प्रति वर्ष 50 टक्के इतक्या खर्चाचा सहभाग/योगदान देणेबाबत व RI व ROW सूट देणेबाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावरिल प्र.कार्यकारी अभियंता (विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, अतिरीक्त् आयुक्त् यांनी केलेल्या शिफारशीसी नुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडिल शासन आदेश क्र. एमसीओ 2020/प्रक्र 71(भाग-2)नवि-14, दिनांक 06/06/2022 अन्व्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 452 अ(1अ) तरतुदीनुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त्, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हददीमध्ये होणाऱ्या सी.सी.टी.व्ही. प्रकल्पा अतंर्गत वार्षिक निगा व दुरूस्ती खर्चाच्या (Opex) 50 टक्के वार्षिक अंदाजे रुपये 1.25 कोटी खर्चाचा महानगरपालिकेचा सहभाग/योगदान देणेस प्रस्तावास मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त्**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**

O/C